# जाहिर निवेदन

## कायदे विषयक सल्लागार पाहिजे

नाशिक जिल्हा परिषदेला खाली दर्शविल्या प्रमाणे जिल्हास्तरीय स्वतंत्र वकील पॅनलवर कायदेविषयक सल्लागारांची नियुक्ती करावयाची आहे.सदर वकील पॅनलची मुदत २०१७-२०१८ ते २०१९-२०२० अशी तीन वर्षाची राहील ज्या व्यक्तींनी ५ वर्षे वकील व्यवसाय केलेला आहे.अशाच व्यक्ती वरील पदासाठी अर्ज करु शकतात.

१.सर्वोच्च न्यायालय
२.उच्च न्यायालय मुंबई/उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ/महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण
३.दिवाणी जिल्हास्तर/तालुकास्तर न्यायालय/दिवाणी कनिष्ठ स्तर न्यायालय/कामगार न्यायालय/औद्योगिक न्यायालय

वकील पॅनल करिता वकील फी, विहीत अर्जाचा नमुना तसेच पॅनलनिमिर्ती नियुक्ती संबंधीच्या अटी व शर्ती हया नाशिक जिल्हा परिषद नाशिक येथिल सामान्य प्रशासन विभागात पहावयास मिळतील तसेच **http://zpnashik.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आला आहे.

ज्या वकीलांची नाशिक जिल्हा परिषदेच्या वकील पॅनलवर काम करणे करिता ईच्छा असेल अशा इच्छुक अर्जदाराने सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक या पत्यावर ऐ ४ साईज पेपरवर संगणीकीकृत अर्ज करावे. अर्ज सादर करण्याचा कालावधी दिनांक १९/११/२०१७ ते दिनांक २८/११/२०१७ या कालावधीत समक्ष अथवा टपालाद्वारे सादर करावा.
(टिप :- सध्या जिल्हा परिषदेच्या कायदेविषक सल्लागार पॅनल वर जे वकील कार्यरत आहेत. त्यांनी देखील अर्ज करणे गरजेचे आहे. त्याशिवाय त्यांच्या नावाचा विचार केला जाणार नाही.)

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

| जिल्हा परिषद नाशिक<br>जिल्हा परिषद विधितज्ञ नेमणुकीकरिता करावयाचा अर्ज<br>(सन- २०१७-२०१८ ते २०१९-२०२०) | पासपोर्ट फोटो लावणे |
|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपुर्ण नाव(मराठी), प्रथम आडनाव | |
| २ | अर्जदाराचे संपुर्ण नाव(इंग्रजी), प्रथम आडनाव | |
| ३ | जन्म तारीख | |
| ४ | निवासी पत्ता | |
| ५ | शैक्षणिक पात्रता (कोणत्या विद्यापीठातुन पदवी प्राप्त केली, विद्यापीठाचे नाव व उत्तीर्ण वर्षे (सोबत सांक्षाकित करून छांयाकीत प्रती जोडाव्या) | |
| ६ | ॲडव्होकेट ॲक्ट १९६१ अंतर्गत नोंदणी क्रमांक व दिनांक | |
| ७ | ई-मेल आयडी व दुरध्वनी क्रमांक | |
| ८ | अनुभव असल्यास न्यायालयाचे नाव | |
| ९ | खालील प्रमाणे कोणत्या न्यायालयात नेमणुकीसाठी अर्ज करावयाचा आहे. ( न्यायालया पुढे टिक (√) करणे) | |
| | १) मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली | |
| | २) मा.उच्च न्यायालय मुंबई/औरंगाबाद | |
| | ३) मा.महाराष्ट्र न्याय प्राधिकारण (मॅट) | |
| | ४) मा.जिल्हा न्यायालय | |
| | ५) मा.औद्योगिक न्यायालय | |
| | ६) मा.कामगार न्यायालय | |
| | ७) मा.दिवाणी न्यायालय जिल्हा /तालुका | |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | सद्यस्थितीत नाशिक जि.प.पॅनलवर कार्यरत असल्यास त्याचा तपशिल | | |
| | न्यायालयाचे नांव | घेतलेल्या केसेस | जि.प.चे बाजुने निकाल लागलेल्या केसेसे |
| | १) मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली | | |
| | २) मा.उच्च न्यायालय मुंबई/औरंगाबाद | | |
| | ३) मा.महाराष्ट्र न्याय प्राधिकारण (मॅट) | | |
| | ४) मा.जिल्हा न्यायालय | | |
| | ५) मा.औद्योगिक न्यायालय | | |
| | ६) मा.कामगार न्यायालय | | |
| | ७) मा.दिवाणी न्यायालय जिल्हा /तालुका | | |
| ११ | वकील पॅनल मध्ये कोणत्या न्यायालयासाठी इच्छुक आहे. तो तपशिल (न्यायालयाचे नाव) | | |
| १२ | अर्जदाराची स्वाक्षरी | | |

# जिल्हा परिषद नाशिक

## वकील पॅनल करिता अटी व शर्ती

१. फी चे दर

| | न्यायालयाचा प्रकार | रक्कम रु. |
|---|---|---|
| वकील फी प्रती केस सर्व खर्च मिळून | अ) सर्वोच्च न्यायालय (अ स्तर) | रक्कम रु.४०,०००/- |
| | ब) उच्च न्यायालय मुंबई/उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ/महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण (ब स्तर) | रक्कम रु.१०,०००/- |
| | क) दिवाणी जिल्हास्तर न्यायालय/दिवाणी कनिष्ठ स्तर न्यायालय/कामगार न्यायालय/औद्योगिक न्यायालय (क स्तर) | रक्कम रु.५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| लेखी कायदेविषय सल्ला/मत | १) अ स्तर | रक्कम रु.२५००/- |
| | २) ब स्तर | रक्कम रु.१२५०/- |
| | ३) क स्तर | रक्कम रु.७००/- |

| | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषदेच्या वतीने कॅव्हेट दाखल करणे | १) अ स्तर | रक्कम रु.२०,०००/- |
| | २) ब स्तर | रक्कम रु.५,०००/- |
| | ३) क स्तर | रक्कम रु.२५००/- |

२.खातेप्रमुखाकडुन जर एखाद्या प्रकरणी कायदेशीर सल्ला विचारला तर त्याकरिता वेगळी फी आकारता येणार नाही.

३.ज्या खात्याची केस असेल त्या खात्याकडे आगाऊ स्टॅम्प रिसिट देऊन फी मागणी करावी लागेल.फि बाबतची स्वतंत्र मागणी संबधित विभाग प्रमुख यांचे कडेस करावी.व ज्या-त्या विभागाच्या दाव्या बाबत संबधित खाते प्रमुख यांचेशी समक्ष संपर्क ठेवावा.

४.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नाशिक यांचे नियंत्रणाखाली व त्यांच्या आदेशाप्रमाणे कोर्टकेस विषयक सर्व कामे पार पाडणे.तसेच आवश्यकते नुसार ईतर न्यायालयाचे कामकाज करणेही बंधनकारक राहील.

५.जिल्हा परिषदेच्या चौकशी प्रकरणी ( जिल्हा परिषदेमार्फत घेतलेल्या कामाची कराराची छाननी करणे व सल्ला देणे ) ज्या प्रकरणी कायदेशिर आवश्यकता असेल तेथे कायदेशिर सल्ला देणे.

६.जिल्हा परिषदेच्या वतीने न्यायालयात (सिव्हिल, क्रिमिनल कामगार इ.कोर्ट प्रकरणे ) खालील परंतुकान्वये चालविणे ( सध्या न्यायालयात चालु असलेली प्रकरणे भविष्यात दाखल होणारी प्रकरणे ) परंतु एखाद्या न्यायालयीन प्रकरणी अन्य वकीलांची नियुक्ती करण्याचा हक्क जिल्हा परिषदेकडे राहिल व तो हक्क राखुन ठेवण्यात आला आहे.

७.जिल्हा परिषद व पंचायत समिती /ग्रामपंचायत अंतर्गत जि.प.शी संलग्न कार्यालयासंबंधी न्यायालयीन प्रकरणी जिल्हा परिषदेविरुध्द न्यायालयात आपणास वकीली करता येणार नाही.या व्यतिरिक्त आपणास खाजगी वकिली करता येईल.

८.जिल्हा परिषदेमार्फत देणेत आलेल्या केसेसचा आढावा दरमहा लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहिल व जिल्हा परिषदेशी वेळोवेळी संपर्कात राहणे आवश्यक आहे.

९.जिल्हा परिषदेच्या ज्या विभागाची केस आहे त्या विभागाचे खाते प्रमुख /कार्यालयीन अधिक्षक / कक्ष अधिकारी यांचेशी भ्रमणध्वनी /दुरध्वनी /ईमेल व्दारे समक्ष संपर्क संबधित वकीलांनी ठेवावा.व समन्वय ठेवावा.

१०.दाव्याच्या तारखेबाबत वकीलांनी ज्या विभागाचा दावा आहे,त्या विभागास वेळोवेळी कळवावे.तसेच त्या खाते प्रमुख यांचेशी समन्वय साधुन व दाव्या बाबत संबधित कार्यालयाकडुन आवश्यक असणारे कागद/पत्रे समक्ष प्राप्त करुन घ्यावेत.

११.काही दाव्याच्या बाबतीत इंग्रजी मध्ये पत्र व्यवहार असतो त्याचे मराठी भाषेत रुपांतर करुन देणेची जबाबदारी संबधित वकीलांची राहील.

१२.जिल्हा परिषदेच्या पॅनल वरील वकीलांनी ऐकमेकात समन्वय ठेवावा.एखादया तारखेस काही कारणास्तव न्यायालयात उपस्थित राहणे शक्य नसल्यास पॅनलवरील वकील यांनी त्याऐवजी पर्यायी वकीलांची व्यवस्था परस्पर करावी.

वरील अटी व शर्ती यांचा भंग झाल्यास वकील पॅनल वरुन संबधित वकीलांना कमी करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखुन ठेवले आहे.

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक